संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचे सभोवताल पर्यावरण संवेदनशील क्षेत्राबाबत सनियंत्रण समिती मध्ये अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्याबाबत..

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्रमांक :- डब्ल्यूएलपी-१०१७/प्र.क्र. २६९ /फ-१

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक :- २८ मे, २०१९.

वाचा :-

१. केंद्रीय पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांनी दिनांक ०५ डिसेंबर, २०१६ रोजी भारत सरकार राजपत्रात जारी केलेली अधिसूचना.
२. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक :--*-** डब्ल्यूएलपी-१०१७/प्र.क्र.२६९ / फ-१, दिनांक ०८.०२.२०१८.

प्रस्तावना :-

संदर्भ क्रामांक १ च्या अधिसूचने अन्वये संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचे सभोवताल पर्यावरण संवेदनशील क्षेत्र जाहीर करण्यात आले आहे. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचे पर्यावरण संवेदनशील क्षेत्रामध्ये प्रभावी देखरेख करण्याचे अनुषंगाने आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे अध्यक्षतेखाली सनियंत्रण समिती गठीत करण्यात आलेली आहे. अधिसूचनेतील अनुक्रमांक 5(g) मध्ये निर्देशीत केल्यानुसार सनियंत्रण समितीमध्ये पर्यावरण क्षेत्रात कार्यरत असलेल्या अशासकीय संघटनेचा प्रतिनीधी, तसेच ५(h) मध्ये निर्देशीत केल्यानुसार सनियंत्रण समितीमध्ये पर्यावरण शास्त्रातील एक तज्ञ नियुक्त करणे आवश्यक होते. त्या अनुषंगाने संदर्भ क्रमांक २ च्या शासन निर्णयान्वे अशासकीय संघटनेचा प्रतिनीधी म्हणून श्री. मयुर कामथ, मुंबई यांची तर पर्यावरणाच्या क्षेत्रातील तज्ञ म्हणून डॉ. भारत भूषण, प्रोफेसर, यशदा, पुणे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचे पर्यावरण संवेदनशील क्षेत्राचे सनियंत्रण समिती मध्ये अशासकीय संघटनेचा प्रतिनीधी म्हणून नियुक्त करण्यात आलेले श्री. मयुर कामथ, मुंबई यांचा कार्यकाळ दिनांक ०७.०२.२०१९ रोजी संपुष्ठात आला असल्याने श्री. मयुर कामथ, मुंबई यांचा कार्यकाळ वाढविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

शासन निर्णय :-

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचे पर्यावरण संवेदनशील क्षेत्राचे सनियंत्रण समिती मध्ये अशासकीय संघटनेचे प्रतिनिधी म्हणून श्री. मयुर कामथ,मुंबई यांची सदर शासन निर्णयाच्या दिनांक पासून एक वर्षाकरीता नियुक्ती करण्यात येत आहे.

२. अशासकीय सदस्यांचा प्रवास भत्ता व दैनिक भत्ता (मुंबई नागरी सेवा नियम खंड-२ मधील परिशिष्ट ४२ (अे) विभाग १) मधील सुधारीत तरतुदीनुसार तसेच शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक प्रवास-१०१०/प्र.क्र.२/सेवा-५, दिनांक ०३.०३.२०१०. व टीआरए-१४७०/१३१/अठरा दिनांक २७.१.१९७१ अन्वये नियमित करण्यात येतील. त्यानुसार अशासकीय सदस्यांना विमानाने तसेच

रेल्वेच्या वातानुकूलित वर्ग-१ श्रेणीने प्रवास करता येणार नाही. तसेच त्यांना खाजगी वाहनांचा वापर करता येणार नाही.

३. या समितीवरील अशासकीय सदस्यांच्या प्रवासभत्ता व दैनिक भत्त्याबाबत होणारा खर्च मागणी क्र-सी-१६ लेखाशिर्ष २४०६, वनीकरण व वन्यजीवन ०२, पर्यावरण वनीकरण व वन्यजीवन, ११० वन्यजीवन ११० (एक) निसर्ग संवर्धन व वन्यपशु संरक्षण (२४०६ ०७६६) या लेखाशिर्षाखाली खर्ची घालण्यात यावा व तो मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०५२८१४३४३४६११९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUJAY DEORAO DODAL

Digitally signed by SUJAY DEORAO DODAL
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=353112ee0fa47f9ff9bedae88f651d09fdb142df5fbce9c004f7eea06d8b9baf, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=a6a471816b9dbfd727f2e5ec4825f4678c8393d846acd1c16b8936c8b3a519c6, ou=REVENUE AND FOREST, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SUJAY DEORAO DODAL
Date: 2019.05.28 14:38:00 +05'30'

(सुजय दोडल)
सह सचिव (वने)
महसूल व वन विभाग.

प्रति,

१. मा. मुख्यमंत्री यांचे सह सचिव, मंत्रालय मुंबई -३२.
२. मा. गृह मंत्री यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
३. मा. मंत्री (वित्त आणि नियोजन, वने) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
४. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२
५. अपर मुख्य सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
६. प्रधान सचिव (वने) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
७. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई.
८. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
९. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
१०. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
११. विभागीय आयुक्त (सर्व)
१२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), मुंबई. व नागपूर.
१३. मुख्य वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली.
१४. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), सर्व
१५. उप वनसंरक्षक (प्रादेशिक), ठाणे.
१६. उप आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई.
१७. उप जिल्हाधिकारी, उपनगर जिल्हा मुंबई/ ठाणे/ पालघर.
१८. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई/ठाणे
१९. नगर रचनाकार अधिकारी, मुंबई/ठाणे/पालघर
२०. सहाय्यक वनसंरक्षक (एलआरपी), ठाणे
२१. श्री. मुयर कामथ, मुंबई.
२२. फ-१ कार्यासन (निवडनस्ती), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.